# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/07/2023 (शुक्रवार) दुपार

---

## मुरूम चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत ०२ किमी अंतरावर भटरा रोड येथे दिनांक ०६/०७/२०२३ चे १७.४५ वा. १८.२० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– विकास केशवराव चकोले, वय ४० वर्ष, रा. वार्ड नं. ०४ एकविरा नगर कुही** हा त्याचे ताब्यातील वाहन ट्रॅक्टर क्र. एम. एच.– ४०/ सी. एच.– ४५३१ व ट्रॉली क्र. एम. एच.– ४०/सी. ए. –३९६७ मध्ये अंदाजे १ ब्रास अवैध्यरित्या मुरूम किंमती अंदाजे २०००/– रूपयाचा मुद्देमाल वाहतुक करतांना मिळुन आल्याने मुरूम, ट्रॅक्टर व ट्रॉली असा एकुण वाहनासह ५०२०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोलीस शिपाई गितेश झडाने रा. पोस्टे कुही यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके पोस्टे कुही मो. नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत टेकाडी कन्हान ATC टॉवर जवळ कन्हान येथे दिनांक २८/०६/२०२३ ते दिनांक २९/०६/२०२३ चे १५.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– प्रदीप मारोतराव विलायतकर, वय ४१ वर्ष, रा. डब्ल्यू सी. एल कॉलनी कन्हान हा एटीसी टॉवर कंपनी मध्ये टेक्नीशीयन या पदावर काम करत असुन एटीसीचे ८ टॉवरचे मेंटनन्सचे काम पाहत आहे. दि. २९/०६/२०२३ रोजी १०/३० वा. इंजीनीयर यांचा फोन आला की आयडीयाची साईट डाउन आहे. फिर्यादीने येऊन चेक केले असता एटीसी टॉवर मध्ये लागलेले रूस कार्ड आयडीया कंपनीचे ३ नग प्रती नग १०,०००/– रू. व एकुण किंमती अंदाजे ३०,०००/–रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सतिश फुटाणे मो. क्र. ९५१८३३४७२३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर